# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं.

**दिनांक : 08.09.2026** **वार : मंगळवार**

---

**ठळक बातम्या**

1. पंतप्रधान आज महाराष्ट्र आणि गुजरातच्या दौऱ्यावर, मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्ट तर गुजरातमध्ये विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी आणि उद्घाटन करणार.
2. भविष्यातील सुरक्षित '6G' दूरसंचार सेवा विकसित करण्यासाठी भारत, अमेरिका आणि इतर 24 देशांच्या गटात सहभागी.
3. संरक्षण क्षेत्राला बळकटी देण्यासाठी 1 लाख कोटी रुपयांहून अधिक किंमतीच्या भांडवली खरेदी प्रस्तावांना मंजुरी.
4. उत्तर प्रदेशातील 25 जिल्ह्यांमध्ये पूरस्थिती गंभीर, आजही मुसळधार पावसाचा इशारा.

**पंतप्रधान दौरा**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र आणि गुजरातच्या दौऱ्यावर आहेत. मुंबईत होणाऱ्या ग्लोबल फिनटेक फेस्ट परिषदेचं त्यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. नागरिक, उद्योग आणि अर्थव्यवस्थांसाठी नवनवीन वित्तीय तंत्रज्ञानाचा विश्वासार्ह, समावेशक आणि परिणामकारी उपयोग कसा करता येईल यावर या परिषदेतल्या संवाद सत्रांमध्ये चर्चा केली जाईल. वडोदरा इथं, पंतप्रधान 35 हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध विकासकामांची पायाभरणी, उद्घाटन आणि लोकार्पण करतील. तसंच, ते 20 हजार 700 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या 'वेस्टर्न डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर'चे तीन विभाग देशाला अर्पण करतील. त्याचबरोबर, 9 हजार 700 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या तीन रेल्वे प्रकल्पांची पायाभरणीही पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे.

**विभागीय परिषद**

पश्चिम विभागातील राज्यांमध्ये आता कोणतेही वाद नाहीत ही महत्त्वाची बाब असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. विभागीय परिषदांचं स्वरूप आता मर्यादित राहिलेलं नाही; या परिषदांच्या माध्यमातून जनहिताच्या योजनांच्या अंमलबजावणीवर काम केलं जात आहे, असं शहा म्हणाले. गोव्यात पणजी इथं झालेल्या 'पश्चिम विभागीय परिषदे'च्या 28व्या बैठकीत ते काल बोलत होते. विभागीय परिषदेच्या माध्यमातून राज्यांमधील नद्यांशी संबंधित अनेक वाद सोडवण्यात आले आहेत, असंही त्यांनी नमूद केलं. महाराष्ट्र 33 हजार 872 स्टार्टअप्ससह देशात प्रथम क्रमांकावर असून, देशाची वित्तीय राजधानी मुंबई ही, जागतिक भांडवलाचं महत्त्वाचं केंद्र म्हणून वेगाने उदयास येत असल्याचं शहा म्हणाले.

**पुरस्कार**

आंतरराष्ट्रीय स्वच्छ हवा दिनानिमित्त नवी दिल्लीत झालेल्या कार्यक्रमात काल राष्ट्रीय स्वच्छ हवा पुरस्कार प्रदान करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्रातील अमरावती शहराला तृतीय क्रमांकाचा राष्ट्रीय पुरस्कार, तर नाशिक महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक 7 ला प्रभागस्तरीय सर्वेक्षणात तृतीय क्रमांक मिळाला. राष्ट्रीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या शहरांना एकंदर 5 कोटी 25 लाख रुपये, तर उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या प्रभागांना 2 कोटी 70 लाख रुपयांची पारितोषिकं प्रदान करण्यात आली. ही पारितोषिकाची रक्कम संबंधित शहरांमध्ये वायू प्रदूषण नियंत्रण, हवेची गुणवत्ता सुधारणा आणि स्वच्छ वायूसाठीच्या विविध उपाययोजनांसाठी वापरण्यात येणार आहे. राष्ट्रीय हरित लवादाचे अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव यांच्या हस्ते हे पुरस्कार देण्यात आले.

**'6-G' नेटवर्क**

'6G' च्या विकासाला दिशा देण्याच्या उद्देशाने सुरू असलेल्या एका आंतरराष्ट्रीय उपक्रमात भारत सहभागी होणार आहे. या उपक्रमात अमेरिकेसह इतर 24 देशांचा समावेश आहे. अमेरिकेतील मियामी इथं 'जी-20 इनोव्हेशन मिनिस्टिरियल' बैठकीदरम्यान केंद्रीय वाणिज्य-उद्योग राज्यमंत्री जितिन प्रसाद आणि अमेरिकेचे वाणिज्य विभागाचे हॉवर्ड लटनिक यांच्यात बैठक झाली; त्यानंतर ही घोषणा करण्यात आली. यावेळी भारत आणि अमेरिका यांच्यात सेमीकंडक्टर्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सेंटर्सच्या क्षेत्रातील सहकार्य अधिक दृढ करण्याबाबत चर्चा झाली.

**संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषद**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत भारताला कायमस्वरूपी सदस्यत्व मिळावं या मागणीचं लक्झेंबर्गचे उपपंतप्रधान आणि परराष्ट्र मंत्री झेवियर बेटेल यांनी समर्थन केलं आहे. सध्याच्या जागतिक व्यवस्थेचे वास्तव प्रतिबिंबित करण्यासाठी या संस्थेत सुधारणा होणं आवश्यक असल्याचं त्यांनी नवी दिल्लीत एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हटलं आहे. भारत आणि ब्राझील अशा प्रमुख देशांना सामावून घेण्यासाठी सुरक्षा परिषदेचा विस्तार केला जाऊ शकतो. असंही ते म्हणाले. विद्यमान नकाराधिकार पद्धतीवरही त्यांनी टीका केली. बेटेल भारताच्या तीन दिवसांच्या दौऱ्यावर आहेत.

**राजनाथ-सिंह**

संरक्षण मंत्रालयानं तीनही संरक्षण दलांसाठी 1 लाख कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या भांडवली खरेदी प्रस्तावांना संरक्षण खरेदी परिषदेने काल मंजुरी दिली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या परिषदेच्या बैठकीत ही मंजुरी देण्यात आली. या प्रस्तावांमध्ये भारतीय लष्करासाठी 'रासायनिक, जैविक, रेडिओलॉजिकल आणि आण्विक' रेकी वाहनं, 'हाय मोबिलिटी व्हेइकल्स' आदी नव्या तंत्रज्ञानाने सज्ज वाहनांच्या खरेदीचा समावेश आहे. भारतीय नौदलासाठी 'अरुध्रा रडार'ची खरेदी, तसेच 'मरीन गॅस टर्बाइन्स' ची रचना, विकास आणि खरेदी यांसाठी आवश्यक असलेली मान्यता देण्यात आली. भारतीय हवाई दलासाठी लढाऊ विमानं, मालवाहू विमानं आणि हेलिकॉप्टर्सची युद्धक्षमता वाढवणाऱ्या विविध प्रस्तावांना तसंच इतर विविध प्रकारच्या खरेदी प्रस्तावांना यावेळी मान्यता देण्यात आली.

**गॅस-सिलेंडर**

स्वयंपाकाचा गॅस सिलेंडर बुकिंगचा कालावधी आता शहरी आणि ग्रामीण भागांसाठी 25 दिवसांचा असा समान असणार आहे. केंद्र सरकारने तेल विपणन कंपन्यांना त्वरित आणि एकसमान वितरणासंदर्भात काल निर्देश दिले आहेत. अशी माहिती पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू राज्यमंत्री सुरेश गोपी यांनी समाजमाध्यमावरील संदेशांत दिली. यापुर्वी पश्चिम आशियातील संघर्षामुळे एलपीजी पुरवठ्यावर निर्माण झालेल्या तणावामुळे, गॅस बुकिंगचा कालावधी शहरी भागांसाठी 25 दिवस आणि ग्रामीण भागांसाठी 45 दिवस असा ठेवण्यात आला होता.

**दिल्ली**

दिल्लीतील सत्य निकेतन भागातील इमारत दुर्घटना प्रकरणी इमारतीच्या तीन मालकांना दिल्ली पोलिसांनी अटक केली आहे. त्यांना पटियाला हाऊस न्यायालयात काल हजर करण्यात आले; न्यायालयाने घरमालक आणि त्याच्या पत्नीला 14 दिवसांची न्यायालयीन कोठडी, तर त्यांचा मुलाला दोन दिवसांची पोलीस कोठडी देण्यात आली. मुलांचे वसतिगृह असलेली ही जुनी इमारत रविवारी कोसळली, या दुर्घटनेत सात जणांचा मृत्यू झाला.

**इराण**

भारताची भूमिका जागतिक स्तरावर महत्त्वपूर्ण असल्याचं इराणनं म्हटलं आहे. नवी दिल्लीत होणाऱ्या आगामी 'ब्रिक्स' शिखर परिषदेसाठी इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेझेशकियान यांच्या नियोजित दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर, इराणच्या परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते इस्माईल बाघई काल पत्रकार परिषदेत बोलत होते. ब्रिक्स संघटना द्विपक्षीय व्यापार आणि धोरणात्मक सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी एक भक्कम व्यासपीठ उपलब्ध करून देईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली. 12-13 सप्टेंबर रोजी नवी दिल्लीत होणाऱ्या 'ब्रिक्स' शिखर परिषदेत राष्ट्राध्यक्ष पेझेशकियान सहभागी होणार आहेत.

**इराण**

पश्चिम आशियातील युध्दपरिस्थितीच्या पार्श्वभूमीवर वाढत्या आर्थिक दबावाचा सामना करत असलेल्या इराणने पेट्रोलचे दर वाढवले आहेत; डिसेंबरनंतर ही इराणने केलेली ही दुसरी इंधन दरवाढ आहे. नवीन दरवाढीनूसार, महिन्याला 110 लिटर या निर्धारित मर्यादेपेक्षा अधिक पेट्रोल खरेदी करणाऱ्या देशांना आता प्रति लिटर एक लाख रियाल मोजावे लागतील; अशी माहिती इराणच्या सरकारी प्रसारमाध्यमांनी दिली आहे. ही दरवाढ डिसेंबरपासून लागू असलेल्या दराच्या दुप्पट आहे. इराण सध्या एकंदर 67 टक्के वार्षिक महागाई दराचा सामना करत आहे.

**पोट निवडणूक**

निवडणूक आयोगाने तीन राज्ये आणि एका केंद्रशासित प्रदेशातील एका लोकसभा आणि पाच विधानसभा जागांसाठी पोटनिवडणुकीची घोषणा काल केली. आसाममधील नागाव लोकसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक तसंच, तामिळनाडू आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी दोन आणि पुद्दुचेरीमधील एका विधानसभा जागेसाठीही पोटनिवडणुकीची घोषणा करण्यात आली आहे. तामिळनाडूतील मदुरांतकम आणि धारापुरम, पश्चिम बंगालमधील रेजीनगर आणि नंदीग्राम, तसेच पुद्दुचेरीमधील थट्टानचावडी या विधानसभा मतदारसंघांसाठी मतदान होणार आहे. लोकसभा आणि विधानसभा पोटनिवडणुकीची अधिसूचना उद्या जारी केली जाईल.

**टेनिस**

इंडोनेशियातील बाली मध्ये आयटीएफ एम-15 टेनिस अजिंक्यपद स्पर्धेत काल झालेल्या अंतिम फेरीत भारताच्या करण सिंघने पुरुषांच्या गटातील टेनिस अजिंक्यपद स्पर्धेचं जेतेपद पटकावलं आहे. त्याने न्यूझीलंडच्या इसाक बेक्रॉफ्टचा पराभव केला.

**पॅरा सिरीज**

अहमदाबाद इथं सुरू असलेल्या जागतिक दिव्यांग तिरंदाजी स्पर्धेत भारतीय तिरंदाज आजच्या अंतिम स्पर्धेत चार सुवर्णपदकांच्या लढतीमध्ये सहभागी होणार आहेत. 'पॅरा रिकर्व्ह महिला सांघिक' सुवर्णपदक लढतीत भारताच्या भावना आणि पूजा यांचा सामना चीनच्या लियांग किउरोंग आणि चेन यू यांच्याशी होणार आहे. तर 'पॅरा रिकर्व्ह पुरुष सांघिक' सुवर्णपदक लढतीत भारताचे हरविंदर सिंग आणि विजय सुंडी यांचा सामना स्लोव्हाकियाच्या डेव्हिड इव्हान आणि डेनिस इव्हान यांच्याशी होईल.

**उत्तर प्रदेश-पूर**

उत्तर प्रदेश मध्ये गेल्या 24 तासात झालेल्या मुसळधार पावसामुळं पाणी पातळीत वाढ झाल्याने धारणांमधून सोडण्यात आलेल्या पाण्यामुळं उत्तर प्रदेशातील 25 जिल्ह्यांमध्ये पूरस्थिति निर्माण झाली आहे. बरेली, एटा, शाहजहांपूर, बहराइच आणि लखीमपूर खेरी या जिल्ह्यात सर्वाधिक पाऊस झाला आहे. या भागात अतिवृष्टीच्या होण्याच्या इशारा  हावामान विभागानं दिला अस्लयानं बरेली मधील सर्व शाळांना पुढील 2 दिवस सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. सरकारी कर्मचाऱ्यांच्या सुट्या मात्र रद्द करण्यात आल्या आहेत.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.